# ST. ARNOLD'S CENTRAL SCHOOL PUNE

TERM - 2 EXAMINATION 2017-2018

SUBJECT : MARATHI

STD - VI | MARK - 40
DATE - 6/3/2018

प्रश्न १ : एका वाक्यात उत्तरे लिहा. (५)

१) समुद्राच्या खोलवर अंधार का असतो?

२) सूत कशाचे असते?

३) अप्पांजींनी बैलगाडीत कशाचे पीक घ्यायला लावले?

४) होळीच्या वेळी झोळी कशाने भरावी?

५) पाणपोईवर पाणी पिण्यास कोण कोण येतात?

प्रश्न २ : रिकाम्या जागा भरा. (५)

१) किटक, पक्षी, अन जलचर ............... तुम्ही वनचर.

२) मिनू ............. पायऱ्या उतरत त्याच्याजवळ पोहोचली.

३) माती आहे म्हणूनच आपण ........... आहोत.

४) नको तोडू वृक्ष, घ्यावी आज अशी ..............

५) आठवते दूध उन्हातली थंडगार सराई ............ सावलीत थाटलेली पाणपोई.

प्रश्न ३ : जोड्या जुळवा. (४)

| | अ गट | ब गट |
|---|---|---|
| १) | चुनखडीचे | चिमणी |
| २) | चतुर असलेले | निसर्गराजा |
| ३) | पाणी भरणारा | खडक |
| ४) | मोबाईलच्या आवाजाची भीती | अप्पाजी |

प्रश्न ४ : खालील शब्दांचे अर्थ लिहा. (५)

१) मासोळी -

२) मातृभूमी -

३) पुरावा -

४) आण -

५) सगेसोयरे -

प्रश्न ५ : शब्दसमुहाबद्दल एक शब्द लिहा. (३)

१) ज्याला आई वडिल नाहीत असा. -

२) कधीही जिंकला न जाणारा. -

३) जादूचे खेळ दाखवणारा. -

प्रश्न ६ : विरूद्धार्थी शब्द लिहा. (२)

१) आंधळा X

२) आशा X

प्रश्न ७ : खालील वाक्यातील विशेषण शोधा व लिहा. (३)

१) रमेशचे घर सुंदर होते.

२) अमर उंच आहे.

३) आज छान जेवण झाले.

प्रश्न ८ : परिक्षेत मिळालेल्या यशाबद्दल तुमच्या मित्राचे अभिनंदन करणारे पत्र लिहा. (५)

प्रश्न ९ : खालील उतारा वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (५)

भारत आमचा देश आहे. भारताच्या उत्तरेला हिमालय पर्वत आहे. गंगा, यमुना, कावेरी, कृष्णा, गोदावरी, अशा अनेक नद्या भारतात वाहतात. भारत निसर्गसौंदर्याने नटलेला आहे.

आमच्या भारतात विविध भाषा बोलल्या जातात. आमच्या भारतात विविध जाती धर्मांचे लोक एकोप्याने राहतात.

तिरंगा हा भारताचा राष्ट्रध्वज आहे. जन-गण-मन हे आमचे राष्ट्रगीत आहे. सत्यमेव जयते हे भारताचे ब्रीदवाक्य आहे. आमच्या प्रिय भारत देशाचा आम्हाला अभिमान आहे. भारताचे भविष्य उज्वल करणे हे आमचे कर्तव्य आहे.

१) भारताच्या उत्तरेला कोणता पर्वत आहे?

२) उताऱ्यामध्ये कोणकोणत्या नद्यांचा उल्लेख आहे?

३) भारताचे ब्रीदवाक्य कोणते?

४) आपले राष्ट्रगीत कोणते?

५) भारताचा राष्ट्रध्वज कोणता?

प्रश्न १० खालील वाक्यातील काळ ओळखा. (३)

१) राजासाहेब तेथे पोहोचतील.

२) मयूर काल जेवला नव्हता.

३) राणी अभ्यास करते.